शुक्रवार दि.१२ एप्रिल २०२४
किंमत २ रुपये । महाराष्ट्र
मराठी दैनिक
वर्ष : ०१ अंक : २३१
टायटल कोड : एमएएचएमएआर५२६७६

जनसामान्य माणसाचे हक्काचे व्यासपीठ

दैनिक लोकनेता बीड

मुख्यसंपादक : ज्ञानेश्वर बुधवत संपादक : ज्ञानेश्वर मुंढे

सुवर्णसंधी...! दैनिक लोकनेता सुवर्णसंधी...!
पत्रकार होण्यासाठी सुवर्ण संधी
दैनिक लोकनेता (जनसामान्य माणसाचे हक्काचे व्यासपीठ)
अल्पावधीतच वाचकांच्या लेखकांच्या पसंतीत उतरलेल्या दैनिक लोकनेता साठी संपूर्ण महाराष्ट्रात जिल्हा, तालुका शहर व गाव पातळीवर प्रतिनिधी नेमणे आहे.अनुभवी व विनाअनुभवी इच्छुकांनी त्वरित संपर्क साधावा !
संपर्क :- संपादक ८४५९९७७९०४

Email : elokneta@gmail.com Lokneta News - लोकनेता न्युज 8459977904 www. lokneta.com

## महाराष्ट्रात नकली शिवसेना अन् राष्ट्रवादी, तर अर्धी संपलेली काँग्रेस

# तीन तिघाडा काम बिघाडा हे कोणाचंही भलं करणार नाहीत-अमित शहा

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**नांदेड (वृत्तसंस्था)**

महाराष्ट्रात तीन पक्ष एकत्र येवून महायुतीला आव्हान देत आहेत. परंतु महाराष्ट्रात यातील नकली शिवसेना, नकली राष्ट्रवादी आणि अर्धी संपलेली काँग्रेस आहे. हे लोकांचे भलं करू शकत नाही. यांच्यावर लोकांचा विश्वास राहिलेला नाही, असा हल्लाबोल केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांनी केला. ते नांदेडमध्ये आयोजित प्रचार सभेला संबोधित करत होते.

अमित शहा पुढे बोलताना म्हणाले की, उद्धव ठाकरेंची शिवसेना व शरद पवारांची एनसीपी अर्धी झालेली आहे. यांनी मिळून काँग्रेसला देखील अर्ध करू टाकले आहे. दोन नकली अन् अन् एक अर्धवट झालेली काँग्रेस पार्टी महाराष्ट्राचे भलं करू शकत नाही. या तीन चाकी ॲटो रिक्षाला कोणतेही भवितव्य नाही. कोणतेही धोरण नाही.

हे निवडणूकीच्या नंतर आपपासांत वाद घालणार आहेत. तर दुसरीकडे मोदींच्या नेतृत्वात देशभक्तांची टोळी एनडीएमध्ये आहे. देशाच्या विकासासाठी एनडीए विचार करत असून त्या दृष्टीने विकास करत आहे.

काँग्रेसवाल्यांना वाटत आहे की, नांदेडचे हवामान बदलले आहे. त्यामुळे सभा होणार नाही. परंतु मी त्यांना सांगतो की, देशाचे हवामान बदलले आहे. फिर एक बार चारसो पार नक्कीच होणार आहे. प्रतापराव पाटील चिखलीकर यांना मत म्हणजे मोदींना मत आहे, असे म्हणत त्यांनी मतदारांना मतदान करण्याचे आवाहन केले.

अमित शहा म्हणाले की, काश्मीरमधील ३७० कलम हटले पाहिजे की नाही, तर देशातील प्रत्येकाला वाटते की, हे हटले पाहिजे, ते काम भाजपने करून दाखवले. पण काँग्रेस अध्यक्ष खरगे म्हणतात की, त्याचा महाराष्ट्र अन् राजस्थानमध्ये जाऊन का गाजावाजा केला जात आहे. काँग्रेसवाल्यांना काश्मीर भारतात वाटत नाही का?, असा सवाल देखील शहा यांनी करत काँग्रेसवर हल्लाबोल केला.

मी शरद पवार यांना विचारु इच्छितो, एक गोष्ट सांगा, १० वर्षांपर्यत तुम्ही सोनिया, मनमोहन सरकारचे कर्ताधर्ता होते, तुम्ही १० वर्षात महाराष्ट्राला काय दिलं? नांदेडकरांनो हिशोब मागयाला हवा की नाही? त्यांनी हिशोब द्यायला हवा की नको? पण ते देणार नाहीत. पण मी हिशोब देवून जातो. त्यांनी १० वर्षात महाराष्ट्राला १ लाख ९१ हजार कोटी रुपये दिले होते. नरेंद्र मोदी सरकारने १० वर्षात ७ लाख १५ कोटी रुपये दिले आहेत.

त्याऐवजी इन्फ्रास्ट्रकच्या विकासासाठी ३ लाख ९० हजार कोटी रुपये दिले. ७५ हजार कोटी रुपये नॅशनल हायवेसाठी, २ लाख १० हजार कोटी रुपये रेल्वेसाठी, ४ हजार कोटी रुपये विमानतळासाठी आणि १ लाख कोटी रुपये स्पेशल इन्फ्रास्ट्रक्चरसाठी प्रोजक्टसाठी देण्याचं काम नरेंद्र मोदींनी केलं आहे. उद्धव ठाकरे, शरद पवार आणि काँग्रेस पक्षाची मंडळी महाराष्ट्राचा विकास



करु शकत नाही. एकनाथ शिंदे आणि देवेंद्र फडणवीस हेच महाराष्ट्राचा विकास करु शकतात, असा दावा अमित शहा यांनी केला.

तत्पूर्वी अमित शहा यांनी खजुराहो लोकसभा मतदारसंघांतर्गत येणाऱ्या कटनीच्या बार्हीं येथे निवडणूक रॅलीला संबोधित केले. ते म्हणाले की, पंतप्रधान मोदींना पराभूत करण्यासाठी जातीवादी आणि कुटुंबावर आधारित पक्ष एकत्र आले आहेत. ते म्हणाले की, काँग्रेसने ७० वर्षे जातीवाद, घराणेशाही आणि भ्रष्टाचाराच्या आधारे राज्य केले. मोदींनी देशातून जातीवाद, घराणेशाही आणि भ्रष्टाचार संपवला. शहा यांनी विरोधी पक्षांच्या घोटाळ्यांचा समाचार घेतला. ज्याने भ्रष्टाचार केला, ज्याने चोरी केली त्याला तुरुंगात जावे लागेल, असे ते म्हणाले.

तत्पूर्वी, केंद्रीय गृह आणि सहकार मंत्री अमित शहा यांनी मांडला येथे सांगितले की, 'पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी देशातील गरिबांना गरिबीतून बाहेर काढण्याचे काम केले आहे. त्यांना स्वयंपाकासाठी गॅस सिलिंडर आणि राहण्यासाठी घरे देण्यात आले आहेत. भाजपचे लोकसभेचे उमेदवार फग्गनसिंग कुलस्ते यांच्या बाजूने गुरुवारी झालेल्या मेळाव्याला संबोधित करताना शहा म्हणाले की, आम्ही देशाची अर्थव्यवस्था जगात पाचव्या क्रमांकावर आणली आहे. मोदीजींना तिसऱ्यांदा पंतप्रधान करा, ते तिसऱ्या क्रमांकावर पोहोचतील.भारतातील विरोधी पक्षांच्या युतीबाबत ते म्हणाले, 'अभिमानी आघाडीच्या नेत्यांना आपल्या मुला-मुलींनीच पुढे जावे असे वाटते.' तत्पूर्वी शहा दुपारी एक वाजण्याच्या सुमारास जबलपूरला पोहोचले होते. येथे त्यांचे मुख्यमंत्री डॉ.मोहन यादव यांनी स्वागत केले.काँग्रेसने देशावर १० वर्षे राज्य केले. आलिया, मालिया, जमालिया पाकिस्तानातून घुसून बॉम्बस्फोट घडवून आणायचे. तत्कालीन पंतप्रधान मनमोहन सिंग यांनीही 'उफ' म्हटले नाही.

मला राहुल बाबांना विचारायचे आहे तुम्ही देशाच्या राष्ट्रपती पदावर कोणत्याही आदिवासीची नियुक्ती केली आहे का? काँग्रेस पक्षाने नेहमीच आदिवासींना फसविण्याचे काम केले आहे.

राम मंदिर बांधायला हवे होते की नाही? ५५ वर्षे काँग्रेस पक्ष दिरंगाई करत राहिला, रखडत राहिला आणि मुद्दा वळवत राहिला. पाच वर्षांत खटला जिंकला, भूमिपूजन झाले आणि प्राणप्रतिष्ठाही झाली.

अहंकारी युती सदस्यांना आपल्या मुला-मुलींनी पुढे जावे असे वाटते. ममता बॅनर्जींना त्यांच्या पुतण्याला बढती द्यायची आहे, शरद पवारांना त्यांच्या मुलीला बढती द्यायची आहे, स्टॅलिन यांना त्यांच्या मुलाची जाहिरात करायची आहे आणि सोनियाजींना त्यांच्या मुलाला बढती द्यायची आहे. जिल्हा खनिज निधीतून आम्ही तुमच्या क्षेत्राचा विकास केला. अहंकारी युती राजवंश व्यवस्थापन निधीत गुंतलेली आहे.अहंकारी आघाडी जिंकली तर ओबीसींचे सर्वाधिक नुकसान होणार आहे. काँग्रेस हा ओबीसी विरोधी पक्ष आहे. काका साहेब, कालेलकर आयोगाचा अहवाल असो की मंडल आयोगाचा, दोन्हीही त्यांनी दाबून ठेवले. शहा म्हणाले - मोदी सरकारमधील २७ मंत्री ओबीसी आहेत, ३७ टक्के खासदार ओबीसी आहेत, मोदींनी ओबीसी आयोगाची स्थापना केली आणि त्याचबरोबर केंद्रातील सर्व शैक्षणिक संस्थांमध्ये ओबीसींना २७ टक्के आरक्षण देण्याचे काम केले.


कलम ३७० पुनर्संचयित करणार असल्याचे काँग्रेसचे म्हणणे आहे. पहिल्यांदा तुम्ही सत्तेवर येणार नाही. तुम्ही आलात तर हात लावू देऊ नका, हा भाजप कार्यकर्त्यांचा निर्णय आहे.

# बिबट्याच्या हल्ल्यात दिड वर्षीय चिमुरडीचा दुर्दैवी अंत

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**जुन्नर । मयूर ढोबळे**

जुन्नर तालुका परिसरात बिबट्यांनी धुमाकूळ घातला आहे. अशाच शिरोली खुर्द (ता.जुन्नर) या ठिकाणी बिबट्याने दीड वर्षाच्या चिमुरडीवर हल्ला करून ठार केल्याची घटना गुरुवारी (दि. ११) पहाटे ५ वाजताच्या दरम्यान घडली. या हल्ल्यामध्ये चिमुकलीचा दुर्दैवी मृत्यू झाला असून घटनेने नागरिकांमध्ये भितीचे वातावरण पसरले आहे. संस्कृती संजय कोळेकर (वय, दीड वर्ष) असे या हल्ल्यात ठार झालेल्या मुलीचे नाव आहे.



सविस्तर वृत्त असे की, मेंढपाळ संजय कोळेकर यांनी शिरोली खुर्द येथील शेतकरी संपत केरू मोरे यांच्या शेतामध्ये मेंढरांचा वाडा लावला होता. त्यावेळी आज गुरुवारी पहाटे ५ दरम्यान मेंढपाळ झोपेत असताना बिबट्याने हल्ला करून या चिमुरड्या मुलीला शेतात ओढून नेले. मेंढपाळाच्या लक्षात आल्यानंतर त्यांनी आरडाओरडा करून स्थानिक नागरिकांना याबाबत कळवले. त्यानंतर वनविभागाचे कर्मचारी, स्थानिक नागरिक व रेस्क्यू टीमने शोध घेतला असता ८ वाजण्याच्या दरम्यान या चिमुरडीच्या मृतदेहाचे काही अवशेष सुभाष थोरात व विश्वास जाधव यांच्या उसाच्या शेताच्या बांधावर आढळून आले. या धक्कादायक घटनेने परिसरामध्ये भितीचे वातावरण पसरले आहे.

जुन्नर तालुक्याचे आमदार अतुल बेनके व विघ्नहर सहकारी साखर कारखान्याचे अध्यक्ष सत्यशील शेरकर, जुन्नरचे उपविभागीय पोलीस अधिकारी रवींद्र चौधर व पोलीस कर्मचारी तसेच वनविभागाचे अधिकारी यांनी घटनास्थळी भेट दिली आहे.

# रमजान महिना भर व ईद निमित्ताने पाटोदा पोलीस स्टेशन ने ठेवली विशेष सुरक्षा

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**पाटोदा । प्रतिनिधी**

रमजान महिना चालू झाल्यापासून पाटोदा शहरांमध्ये संध्याकाळच्या वेळेस रोजा इफ्तार च्या खरेदीसाठी रस्त्यावर विक्रेत्यांची व लोकांची गर्दी होत असल्याने पाटोदा पोलीस स्टेशनचे सहाय्यक पोलीस निरीक्षक श्री.अनमोल केदार यांनी दररोज सायंकाळी डॉ.बाबासाहेब आंबेडकर चौक ते छत्रपती शिवाजी महाराज चौक असे पोलीस गस्त सुरू ठेवली होती. तसेच प्रत्येक शुक्रवारच्या नमाजाच्या ठिकाणी योग्य पोलीस बंदोबस्त नेमला होता. पवित्र रमजान महिन्यांमध्ये रोजा ठेवणाऱ्यांसाठी पोलीस स्टेशन पाटोदा येथे पोलीस स्टेशन तर्फे रोजा इफ्तार पार्टीचे आयोजन करण्यात आले. सदर इफ्तार पार्टी मध्ये पाटोदा शहरातील



हिंदू-मुस्लिम ऐक्य दिसून आले. तसेच रमजान ईद व महात्मा ज्योतिबा फुले यांची जयंती एकाच दिवशी व डॉ.बाबासाहेब आंबेडकर जयंती १४ एप्रिल रोजी साजरी होणार असल्याने पाटोदा शहरातील प्रतिष्ठित नागरिकांची शांतता बैठक घेण्यात आली. आज दिनांक ११/०४/२०२४ गुरुवार रोजी रमजान ईद निमित्त ईदगाह मैदान पाटोदा येथे मुस्लिम बंधूंना ईदच्या नमाज पठनाच्या वेळी पोलिसांचा योग्य बंदोबस्त लावण्यात आला होता. तसेच नमाज झाल्यानंतर पाटोदा पोलीस स्टेशनचे सहाय्यक पोलीस निरीक्षक श्री.अनमोल केदार, पोलीस उपनिरीक्षक श्री. गाडे, पोलीस उपनिरीक्षक श्री. काटकर, पोलिस अमलदार गडकर यांनी मुस्लिम बांधवांना ईद च्या शुभेच्छा दिल्या. या वेळी मा.तहसीलदार निलावाड साहेब तसेच पाटोदा शहरातील प्रतिष्ठित नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## चालत्या कंटेनरने घेतला अचानक पेट; जीवीत हानी नाही

मोहोळ - चेन्नईहून अहमदाबादकडे ह्युंदाई कंपनीच्या आठ कार गाड्या घेऊन निघालेल्या कंटेनरला उष्णतेने वायरचे शॉर्टसर्किट होऊन मोहोळ शहरा नजीक अचानक आग लागली. वेळीच परिसरातील ग्रामस्थांच्या मदतीने व अग्निशामक दलाच्या गाडीने आग विझवण्यात आली. या घटनेत कोणतीही जिवित हानी झाली नाही.चेन्नईहून अहमदाबादकडे ह्युंदाई कंपनीच्या आठ कार गाड्या घेऊन निघालेल्या कंटेनर क्रं एच आर ४७ सी ९९७९ हा शहरा नजिक आसणाऱ्या उड्डाण पुलाजवळ येताच गाडीच्या केबीन मधे उन्हामुळे गरम झालेल्या वायरीगंचे शॉर्ट सर्कीट होऊन आग लागली.आग लागताच गाडीतील ड्रायव्हर अमन कुमार याने सावधगीरी बाळगत गाडी रोडच्या कडेला घेत उडी मारली. व बॅटरीचे कनेक्शन तोडले. गाडीत दोघे जण होते. शहरानजिक घटना घडल्याने लगेच बघ्यांची गर्दी जमा झाली.शेजारीच आसणाऱ्या सिनेमा ग्रहातुन पाण्याचा पाईप जोडुन नागरीकांनी आग विझविण्याचा प्रयत्न केला. दरम्यान अनगर येथील लोकनेते साखर कारखान्याच्या अग्नीशामक दलाच्या गाडीला पाचारण करण्यात आले. गाडी येताच आग विझविण्यात आली. या घटनेत कोणतीही जिवित हानी झाली नाही.

## चारोळी

**मनातलं विचारांच बीज**
**भुईत जोमानं रुजावं**
**तेजाळल्या दिशा शोधत**
**अंधाराला भेदून शब्दांकूर झेपवावं.**

रंजना सानप
मायणी (सातारा)

## भोकरदन तालुक्यातील भायडी येथे विजेच्या कडकडाटा सह अवकाळी पाऊस व प्रचंड प्रमाणात गारपीट



■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**दानापूर । राम शिंदे**

भोकरदन तालुक्यातील अनेक परिसरामध्ये वादळी वाऱ्यासह अवकाळी पाऊस मोठ्या प्रमाणात गारपीट झाली भायडी या गावांमध्ये गारपिटीमुळे जागोजागी ढिगार साचलेले होते व तसेच दानापूर या परिसरामध्ये सुद्धा मोठ्या प्रमाणात गारपीट झाली तसेच सिपोरा या भागांमध्ये सुद्धा गारपिटीचे प्रमाण जास्त होते या गारपिटीमुळे भोकरदन तालुक्यामध्ये शेतकऱ्यांच अतोनात नुकसान झालेला आहे शेतामध्ये अनेक पिकांची नासाडी झालेली आहे भोकरदन तालुका परिसरामध्ये गारपीटीच प्रमाण जास्त असल्यामुळे शेतकऱ्यांचे पिके मातीत गेले आहे शेतकऱ्यांची पिके निसर्गाने हिरावून घेतले आहे यंदा अत्यल्प पावसामुळे उत्पादनामध्ये घट झालेली आहे, जे उत्पादन शेतकऱ्यांना निघालेलं होतं त्या उत्पादनाला सुद्धा भाव मिळालेला नाही आणि या शेतकऱ्यांच्या रब्बी पिकावर निसर्गाने घाला घातलेला आहे या वादळी वाऱ्यासह गारपीट क अवकाळी पावसामुळे शेतकऱ्यांचं अतोनात नुकसान झालेलं आहे, शेतकऱ्यांना प्रश्न पडतो की कुटुंबाचा उदारनिर्वाह कसा करावा असा शेतकऱ्यासमोर प्रश्न उद्भवतो..




दीप भारती माध्यमिक उच्च माध्यमिक विद्यालय माहोरा या शाळेमध्ये क्रांतीसुर्य महात्मा ज्योतिबा फुले यांची जयंती मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली यावेळी सर्व शिक्षक शिक्षकेतर कर्मचारी आणि विद्यार्थी उपस्थित होते.... छाया : लोकनेता न्युज नेटवर्क



संपादकीय

# विकासाचे पर्यावरण



लोकनेता न्यूज नेटवर्क

सर्वोच्च न्यायालयाचा हा महत्त्वपूर्ण निकाल आला असतानाच रिझर्व्ह बँकेने हवामान बदलांमुळे येणाऱ्या संभाव्य महागाईच्या फेऱ्याकडे लक्ष वेधले आहे. माणूस आपल्या कर्तबगारीने निसर्गाला जे वेडेवाकडे वागायला भाग पाडतो आहे; त्यामुळे साऱ्या जगभरात पाऊसमान, त्याची नैसर्गिक शिस्त व प्रमाण बिघडते आहे.

खराखुरा चिरंजीव विकास, पर्यावरणाचे संरक्षण, गरिबीशी लढाई आणि आर्थिक प्रगतीचे निकष या साऱ्याच संकल्पनांची जबरदस्त घुसळण यापुढे वेगाने होणार आहे. त्यानुसार, पुढच्या काळात माणसाला इतरही जीवसृष्टी आपल्यासोबतच पृथ्वीवर राहते आहे; याचे वाढते भान दैनंदिन जीवनातील जवळपास प्रत्येक कृतीत, उपभोगात आणि चैनीच्या अनुभवातही बाळगावे लागणार आहे. सर्वोच्च न्यायालयाने राजस्थानातील वाळवंटी भागांमध्ये वीजवाहक तारा टाकण्यावरची बंदी उठवितानाच माळढोक या नष्टप्राय होण्याचा धोका असणाऱ्या पक्ष्याच्या जतन-संवर्धनासाठी स्वतंत्र समिती नेमावी; यावरून या प्रश्नाची गुंतागुंत लक्षात येते.

सर्वोच्च न्यायालयाने २०१९ मध्ये दिलेल्या एका निकालात राजस्थानातील जवळपास ९० हजार चौरस किलोमीटर परिक्षेत्रात उच्च दाबाच्या वीजवाहक तारांचे जाळे उभारण्यास संपूर्ण बंदी केली होती. याचे मुख्य कारण, या क्षेत्रात आढळणारे माळढोक पक्षी हे होते. या तारांमध्ये अडकून किंवा त्यांच्यावर आदळून माळढोक पक्षी मरण पावले तर 'नष्टप्रायतेच्या शक्यता यादी'त असणारा माळढोक वेगाने संपेल, ही भीती होती. पर्यावरणवाद्यांची ही चिंता जाणून खंडपीठाने तेव्हा ती पूर्ण बंदी घातली. यातून एक विचित्र विरोधाभास जन्माला आला. या प्रस्तावित तारा राजस्थानातील सौर उर्जेच्या प्रकल्पांमधून निर्माण होणारी वीज वाहून नेण्यासाठी असणार होत्या. भारताने सन २०७० पर्यंत शून्य कर्ब उत्सर्जनाचे लक्ष्य स्वीकारले आहे. ते प्रत्यक्षात आणायचे तर मोठ्या सौर ऊर्जा प्रकल्पांना पर्याय नाही. मात्र, सुप्रीम कोर्टाने घातलेल्या बंदीमुळे हे प्रकल्पच झाले नाहीत, लक्ष्य गाठले गेले नाही आणि कर्बोत्सर्जन थांबले नाही तर एकूण पर्यावरणाच्या रक्षणासाठी ते घातकच ठरणार होते. थोडक्यात, पर्यावरण रक्षणाची आणि चिरंजीव विकासाची संकल्पना प्रत्यक्षात आणायची तर राजस्थानातील या भागात वीजवाहक तारांचे जाळे असावेच लागेल. ही शृंगापत्ती सोडविण्याचा सरन्यायाधीश धनंजय चंद्रचूड यांच्या खंडपीठाने जो प्रयत्न केला आहे; त्याबद्दल त्याचे अभिनंदन करायला हवे. तारांवरची बंदी उठवितानाच सर्वोच्च न्यायालयाने माळढोक पक्ष्यांच्या नेमक्या वसतिक्षेत्राचा अभ्यास करण्यासाठी समिती नेमली. तिचा अहवाल ३१ जुलैच्या आत सरकारमार्फत न्यायालयासमोर यावा लागेल. भारतातील सौर उर्जेचे उत्पादन वेगाने वाढले आणि एकूणच कार्बनचे उत्सर्जन कमी झाले तर ते एकूणच जीवसृष्टीच्या भल्याचे ठरणार आहे. त्यात माळढोक तर आलेच पण इतरही असंख्य प्रजातीही आल्या.सर्वोच्च न्यायालयाचा हा महत्त्वपूर्ण निकाल आला असतानाच रिझर्व्ह बँकेने हवामान बदलांमुळे येणाऱ्या संभाव्य महागाईच्या फेऱ्याकडे लक्ष वेधले आहे. माणूस आपल्या कर्तबगारीने निसर्गाला जे वेडेवाकडे वागायला भाग पाडतो आहे; त्यामुळे साऱ्या जगभरात पाऊसमान, त्याची नैसर्गिक शिस्त व प्रमाण बिघडते आहे. तापमानातील बेबंद वाढही यातच आली. हे असेच चालले तर अन्नधान्याचे उत्पादन घटत जाईल. ते महाग होईल आणि त्यातून एकूण महागाई वाढेल, असे रिझर्व्ह बँकेने म्हटले आहे. सर्वोच्च न्यायालय आणि रिझर्व्ह बँक यांनी एकाच दिवशी व्यक्त केलेल्या शक्यतांचा एकच संदेश आणि अर्थ आहे; तो म्हणजे, विकासाची, प्रगतीची निसर्गानुकूल रचना करणे. काही दिवसांपूर्वी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी बिल गेट्स यांच्याशी संवाद साधला. यावेळी मोदींनी जी हरित जीडीपीची संकल्पना उचलून धरली; ती सध्याच्या अर्थशास्त्रीय कोष्टकांची चौकट ओलांडणारी आहे. म्हणजे अधिकाधिक उपभोग, अधिकाधिक उर्जेचा, वाहनांचा, पेट्रोलचा वापर म्हणजे विकासाची चढती भाजणी हे प्रमेयच कधी तरी पुरते बदलून टाकावे लागणार आहे. सर्वोच्च न्यायालयात याचिका करताना पर्यावरण कार्यकर्ते एम. के. रणजितसिंह यांनी तारांच्या जाळ्यात माळढोक फसतात आणि हेच त्यांच्या मृत्यूचे महत्त्वाचे कारण आहे, असे म्हटले होते. पण माळढोक व इतरही नष्टप्राय पक्ष्यांच्या घटत्या संख्येचे एक महत्त्वाचे कारण त्यांच्या आहारातून होणारी विषबाधा हेही आहे. ते दूर करण्यासाठी अधिक व्यापक विचार करावा लागणार आहे. सर्वोच्च न्यायालयाने आपल्या निरीक्षणांमध्ये या साऱ्या प्रश्नाकडे तुकड्या-तुकड्याने न पाहता सम्यक दृष्टीने पाहण्याची गरज बोलून दाखविली आहे. ती फार महत्त्वाची आहे. त्यामुळेच, खंडपीठाने माळढोक पक्ष्यांच्या वावराचा १३ हजार चौरस किमी क्षेत्राचा गाभा परिसर तारामुक्त ठेवा; असे म्हटलेच आहे. मोठ्या कॅनव्हासवरचे चित्र पाहायचे ठरविले तर सौरउर्जेचे वाढते उत्पादन आणि पर्यावरण संरक्षण या दोन्ही गोष्टी परस्परांना पूरकच आहेत. प्रत्यक्षात राजस्थानातील बंदीमुळे त्या जणू परस्परविरोधीच आहेत; असे चित्र निर्माण झाले होते. ताज्या निकालाने ते दूर झाले आहे. यातून धडा घेऊन संपूर्ण देशाचे समन्वित, सम्यक पर्यावरणीय मानचित्र केंद्र सरकारने तयार करायला हवे. तसे केले तर अनेक अंतर्विरोध टळतील.

# राज्यात फक्त ३८ टक्के जलसाठा सोबत उष्णतेची लाट;तर दुसरीकडे पाण्याचा हाहाकार!

लोकनेता न्यूज नेटवर्क

उन्हाचे चटके चोहोबाजूंनी जाणवू लागले असतानाच राज्यात लघु,मध्यम व मोठ्या प्रकल्पात केवळ ३८ टक्के उपयुक्त पाणीसाठा शिल्लक आहे.पाणी टंचाईच्या झळा जाणवू लागल्याने राज्यातील १ हजार २३३ गावात आणि २ हजार ७७५ वाड्यांवर टँकरने पाणीपुरवठा केला जात आहे.यामुळे यावर्षी पाणीप्रश्न अत्यंत गंभीर होण्याचा धोका व्यक्त होत आहे.येत्या काळात उन्हाचा पारा वाढल्याने पाण्याची भिषण टंचाई निर्माण होवू शकते याला नाकारता येत नाही.कारण राज्यातील २ हजार ९९४ प्रकल्पांची एकुण क्षमता ४० हजार ४८५ दशलक्ष घनमीटर आहे.सध्या या प्रकल्पामध्ये फक्त १५ हजार १८९ दशलक्ष घनमीटर पाणी साठा उरला आहे. म्हणजेच दिवसेंदिवस पाण्याची समस्या आणखीनच बिकट होण्याची शक्यता दिसत आहे.सध्या राज्यातील १८ ते २० धरणे कोरडी पडली आहेत.त्यामुळे येत्या काळात तीव्र पाणीटंचाईला सामोरे जावे लागणार असल्याचे चिन्ह जवळपास निश्चित आहे.यावर्षी नेहमीपेक्षा कमी पाऊस झाल्याने उष्णतेच्या लाटे सोबतच पाण्याच्याही हाहा:काराला आतापासूनच सुरूवात झाली आहे.दरवर्षी पावसाची कृपादृष्टी असणारा पश्चिम महाराष्ट्र यंदा पाण्यासाठी तडफतो आहे. त्यामुळे आतापासूनच टँकरग्रस्त झाला आहे.पुणे विभागातील कोल्हापूर जिल्हा वगळता पुणे, सातारा, सांगली, आणि सोलापूर या चार जिल्ह्यांतील विहिरींनी तळ गाठला आहे. यामुळे ३३४ गावातील ६ लाख ७२ हजार ८०७ नागरिकांना ३६४ टँकरने पाणीपुरवठा करण्यात येत आहे.यावरून स्पष्ट होते की संपूर्ण महाराष्ट्रात पाण्याची टंचाई भेडसावणार आहे. याचे प्रायचित्य मानव, पशुपक्षी, संपूर्ण जीवजंतू,जंगल संपदा यांना आतापासूनच भोगावे लागत आहे.अजुन पावसाळ्याला तीन महिने बाकी आहे.राज्यासह देशातील जलाशय साठा निम्म्यावर आलेला आहे तर दुसरीकडे सुर्य आग ओकत आहे म्हणजेच पाण्याची समस्या आणि सुर्याचे अक्राळविक्राळ रूप आणि जलसाठा कमी होने



यामध्ये पृथ्वीतलावरील संपूर्ण जीवसृष्टीला यावर्षी अत्यंत कठीणायीचा सामना करावा लागण्याचे स्पष्ट चित्र दिसत आहे. महाराष्ट्रासह देशातील बदलत्या हवामानामुळे सर्वत्र उष्णतेची लाट तर कधी अवकाळी पाऊस व गारपीट यामुळे संपूर्ण जीवसृष्टी मानव, पशुपक्षी यांचे जीवन विस्कळीत होतांना दिसते तर दुसरीकडे वाढत्या तापमानामुळे पाण्याची समस्या दिवसेंदिवस अत्यंत बिकट होतांना दिसत आहे.विदर्भात नागपूर, यवतमाळ, अकोला, चंद्रपूर येथे उष्णतेची लाट कायम आहे तर मुंबईसह रायगड, ठाणे, पालघर येथे उकाडा वाढला आहे.म्हणजेच सुर्याने आपले उग्र रूप कळत न कळत सर्वत्र पसरविले आहे.त्यामुळे हवामान खात्याने महाराष्ट्रातील अनेक जिल्ह्यांना उष्णतेच्या बाबतीत एलो अलर्ट घोषित केले आहे.५ तारखेला सोलापुरचे सर्वाधिक तापमान ४३.१ अंश सेल्सिअस, विदर्भातील सरासरी तापमान ४२ अंश सेल्सिअस, मध्य महाराष्ट्र व मराठवाड्यातील तापमान ४० अंश सेल्सिअसची नोंद झाली.यावरून स्पष्ट होते की दिवसा तर उकाडा वाढलाच परंतु रात्रीही उकाड्याचे चटके संपूर्ण महाराष्ट्राला सहन करावे लागत आहे.हवामान खात्याने असेही वर्तविले आहे की एप्रिल ते जून महिन्यात देशातील अनेक भागातील उन्हाची झळ अधिक तीव्र होण्याची शक्यता आहे. त्यामुळे येणारे तीन महिने सर्वांनीच आपापली काळजी घेणे गरजेचे आहे.राज्यातच नाही तर देशातील अनेक भागात सुर्य आग ओकतांना दिसतो आणि हा संपूर्ण प्रकार दिवसेंदिवस बदलत्या हवामानामुळे निर्माण झालेला आहे.यावर्षी वेळेच्या आधीच सुर्याने आक्राळ - विक्राळ रूप धारण केल्याचे दिसून येते आणि पुढे आणखी भयानक स्थिती निर्माण होवू शकते याला नाकारता येत नाही.कारण आतापासुनच नदि, तलाव, विहिरी, धरणे यांच्या पाण्याची पातळी कमी कमी होत आहे आणि ही परिस्थिती संपूर्ण महाराष्ट्रातच नाही तर देशासह संपूर्ण जगात आपल्याला पहायला मिळेल.आतापासुनच महाराष्ट्रात तापमानाचा पारा सिमापार करून पुढील काही दिवसांत कठीण परिस्थितीत निर्माण करण्याची भीती वर्तवली जात आहे.कारण मानवाने केलेला निसर्गाचा ह्यास यामुळेच आज आपल्याला उन्हाचे चटके व पाणी टंचाईचा सामना करावा लागतो आहे. त्याचप्रमाणे मानवाने केलेल्या पापाचे प्रायश्चित्त मानव तर भोगतच आहे सोबतच पशुपक्षी, संपूर्ण जीवसृष्टी, पृथ्वी, आकाश-पाताळ,नदि-नाले,तलाव, धरणे, विहिरी यांनाही भोगावे लागत आहे.कारण राज्यासह देशातील वाढते तापमान हे दिवसेंदिवस निसर्गावर सरळ प्रहार करीत असुन संपूर्ण निसर्गाचे संतुलन ढासळत आहे त्यामुळे ही गंभीर समस्या निर्माण झाली आहे.त्यामुळे नागरिकांनी वाढत्या तापमानापासुन स्वतःला सांभाळणे गरजेचे आहे.बदलत्या हवामानामुळे यावर्षी पाऊस कमी झाला. त्यामुळे आतापासूनच राज्यातील अनेक भागात आपल्याला पाणी टंचाई दिसून येत आहे.जलाशयामध्ये फक्त ३८ टक्के जलसाठा उपलब्ध असल्याचे सांगितले जाते.म्हणजे एकीकडे तापमानात वाढ यामुळे आरोग्यावर विपरीत परिणाम,तर दुसरीकडे पाणी टंचाई अशा डबल गंभीर समस्यांशी आपणा सर्वांना झुंज द्यावी लागणार आहे.वाढत्या तापमानामुळे उष्णतेची व अवकाळी पावसाचे बादल महाराष्ट्रासह अनेक राज्यात दिसून येते.राज्यात वाढते तापमान पहाता आरोग्य विभागाने उष्माघातापासून बचाव करण्याचे आवाहन सुध्दा केले आहे.वाढत्या उष्णतामानामुळे उन्हात फिरल्याने डोके दुखी,ताप येणे, जास्त घाम येणे, चक्कर येणे, बेशुद्ध पडने अशा पध्दतीची साधारणतः उष्माघाताची लक्षणे जानवु शकतात.यावर प्राथमिक उपाय म्हणून स्वतःची काळजी घेणे गरजेचे आहे.सावलीचा सहारा घेणे, थंड पेय घेणे,नारळाचे पाणी पिने, पाणी भरपूर पिने साधारणतः बाहेर निघताना कॉटनचे सैल कपडे घालावेत आणि जास्तच अस्वस्थ वाटत असेल डॉक्टरांचा सल्ला घ्यावा.परंतु आज वाढत्या तापमानामुळे पशुपक्ष्यांना पाण्यासाठी वणवण भटकावे लागत आहे त्यामुळे त्यांच्यासाठी आपापल्या पद्धतीने पाण्याची व्यवस्था केली पाहिजे व पशुपक्षांना वाढत्या तापमानापासुन दिलासा दिला पाहिजे.बदलते हवामान, पाणी साठा कमी होने,अती उष्णता, अवकाळी पाऊस याला रोखण्यासाठी राज्यासह देशात मोठ्या प्रमाणात वृक्षारोपण व्हायला हवे.यामुळे वातावरणात आमुलाग्र बदल झाल्याचे दिसून येईल व निसर्ग प्रफुल्लित राहील.

**रमेश कृष्णराव लांजेवार**
**(माजी विद्यापीठ प्रतिनिधी, नागपूर)**
**मो.नं.९९२१६९०७७९, नागपूर.**

# 'पंचमहाभूतांचा' सहवास!

लोकनेता न्यूज नेटवर्क

अडचणी-आपत्तीच्या काळात येणारे नैराश्य वेदनामयी असायचे. अशा प्रसंगी साथसंगत करणारी ही पंचमहाभूते पुन्हा उभे करत होती. त्यामुळेच माझे जगणे सुंदर झाले.

प्रत्येक व्यक्ती व प्राणिमात्रांचे रक्षण सभोवतालची पंचमहाभूते करीत असतात, हे सर्वज्ञात आहे. मात्र, माझ्या भवताली या पंचमहाभूतांशिवाय आणखी पाच महाभूते छंदरूपात वास करीत आहेत. मनसोक्त वाचन, लेखन, निसर्ग भ्रमण, चित्रपट आस्वाद आणि व संगीत प्रेम, ही ती पंचमहाभूते! ही महाभूते माझी ऊर्जा सातत्याने वाढवत आहेत.



माझे आई-वडील वाचनवेडे होते. त्यांच्या सानिध्यात मला भरभरून वाचावयास मिळाले. दैनंदिनी लिहिता लिहिता लेखणीशी मैत्री झाली. फिरणाऱ्या सवंगड्यांसोबत मनसोक्त भटकंती घडली. चांगले चित्रपट प्रदर्शित करणाऱ्या जाणत्या प्रभात चित्र मंडळात आलो अन् चित्रपटप्रेमी झालो. या साऱ्यांमध्ये गीत-संगीताचा श्रवणछंद अग्रणी होता. मात्र, हे करताना दैनंदिन वाटचालीत सारे काही सहजसुलभ नव्हते. अडचणी-आपत्तीच्या काळात येणारे नैराश्य वेदनामयी असायचे. अशा प्रसंगी साथसंगत करणारी ही पंचमहाभूते पुन्हा उभे करत होती. त्यामुळेच माझे जगणे सुंदर झाले.

वाचन छंद जोपासताना कुसुमाग्रज, पु.ल., नारायण सुर्वे, वसंत बापट, साने गुरुजी, गदिमा, गोनीदा, विंदा करंदीकर, पाडगावकर, आचार्य अत्रे, शंकर पाटील, बा. भ. बोरकर, बालकवी... अशा दिग्गजांचे साहित्य वाचावयास मिळाले. वाचता वाचता स्वाक्षरी गोळा करण्याचा नाद लागला. या नादापायी भली भली माणसं जवळून न्याहाळता आली. हे वाचन सातत्य आजही सुरू असले तरी स्वाक्षरी गोळा करण्याचा छंद थांबलाय. लिहिणे सुरू केल्यावर वृत्तपत्रं, मासिकं, आणि आकाशवाणी, ही तीनही माध्यमं प्रतिसाद देऊ लागली. त्यामुळे उमेद वाढून अधिक लिहिता झालो. या लिहिण्यातून मन 'मोकळं' होत होतं. हा लेखन पसारा ब्लॉग लेखनापर्यंत गेला. पुस्तकं छापून प्रकाशित होणं ही त्यापुढची पायरी.

निसर्गाच्या सहवासातला आनंद तर आगळावेगळा. अवघे आयुष्य अपुरे ठरेल, एवढा विस्तीर्ण पृथ्वीचा परीघ आहे. किती अन् कुठवर भटकू, एवढे मोठे दान मला पृथ्वीने दिले. मनसोक्त पदभ्रमण, गिर्यारोहण करताना मिळणारी अनुभूतीही अवर्णनीय आहे. शहर सीमा ओलांडल्या की सर्वदूर पसरलेला संपन्न महाराष्ट्र, खासकरून पुणे, नगर, सातारा, कोल्हापूर, मराठवाडा, विदर्भ आणि कोकण प्रांतात भटकताना प्राचीन वास्तू, दुर्गम गडकोट, स्वच्छ-नितळ समुद्र किनारे, नदी-नाले, हिरवीगार वनराई मला संमोहित करीत राहिली. शेजारचा गोवा, तामिळनाडू, आणि प्रदीर्घ समुद्र सफर पार करीत निसर्गरम्य अंदमान पाहता आले. त्यापुढे दौड करताना हिमाचल, उत्तराखंड, सिक्कीमची उत्तुंग हिमशिखरे बघायला मिळाली. आजही मी या भ्रमण-भटकंतीत गुंतून राहिलोय.चित्रपट माध्यम हे रसिकाचे फक्त मनोरंजन करणारे नव्हे, तर जनमानसावर प्रभाव टाकणारे माध्यम आहे. चित्रपटातील वास्तव भावार्थ कोणता याची चिकित्सा करण्याआधी तो नीट जाणून घ्यावा लागतो. याची ओळख मला 'प्रभात'ने करून दिली. 'प्रभात'मुळे मला देशी-विदेशी, पुरस्कार प्राप्त व दुर्मिळ चित्रपट पाहायला मिळाले. चांगले रसिक प्रेक्षक घडविण्याचा ध्यास घेतलेली महाराष्ट्रातली जुनी जाणती संस्था 'प्रभात चित्र मंडळ' आजही सक्रिय आहे. चित्रपटसृष्टीतील अभ्यासू वर्गाची मांदियाळी असलेल्या या संस्थेचा सदस्य असणे हे माझे सौभाग्य. प्रांत, भाषा आणि धर्माच्या पलीकडे पोहोचलेले सुमधुर संगीत मला प्रफुल्लित ठेवते. रेडिओ पूर्वीपासूनचा माझा सोबती. त्याशिवाय, सुरेल गाणी, नाट्यगीते, अन् शास्त्रीय वाद्यसंगीताचा अनमोल खजिना संग्रही असल्याने एकटेपणा अन् उदासी मला सुसह्य ठरते. या पंचमहाभूतांच्या साथसंगतीत मी विलक्षण समाधानी आहे. आयुष्यात आनंदी राहण्यासाठी अजून वेगळे काय हवे?

# आघाडीचे पुढचे पाऊल

लोकनेता न्यूज नेटवर्क

इंडिया' आघाडीतील पक्ष इतर राज्यांत परस्परांच्या विरोधात लढताना दिसत आहेत. या पार्श्वभूमीवर महाराष्ट्रातील 'मविआ'चे जागावाटप मार्गी लागणे ही बाब महत्त्वाची आहे.लोकसभा निवडणुकीच्या संग्रामात दुसऱ्या क्रमांकाच्या म्हणजे ४८ जागा असलेल्या महाराष्ट्राचे महत्त्व विशेष आहे. उत्तरेकडे भक्कम पकड जमविलेल्या भारतीय जनता पक्षाला महाराष्ट्राचा 'पेपर' मात्र सोपा वाटत नाही, असे दिसते. या पार्श्वभूमीवर महाविकास आघाडीने जागावाटप जाहीर करणे ही गोष्ट महत्त्वाची आहे. काही जागांवरील उमेदवार जाहीर व्हायचे बाकी असले तरी आघाडीने एक पाऊल पुढे टाकले आहे.सांगली, दक्षिण- मध्य मुंबई, भिवंडीसह काही जागांवरून आघाडीअंतर्गत धुसफुस सुरू असली तरी सगळ्याच प्रश्नांवर तोडगा काढत न बसता पुढे जाण्याचा निर्णय आघाडीच्या नेत्यांनी घेतल्याचे दिसून येते. त्याचमुळे आघाडीचे शिल्पकार,ज्येष्ठ नेते शरद पवार यांनी, आमच्यात मतभिन्नता नसल्याचे आणि एकजुटीने निवडणुकीला सामोरे जाण्यास सज्ज असल्याचे सांगितले.महाराष्ट्राच्या राजकारणात एका वेगळ्या पार्श्वभूमीवर महाविकास आघाडी आकाराला आली होती आणि त्याची मोठी किंमत शिवसेना आणि राष्ट्रवादी काँग्रेस या दोन पक्षांना मोजावी लागली. त्यानंतरही तिन्ही पक्ष एकत्र राहिले आहेत. केंद्रीय पातळीवर विरोधी पक्षांची 'इंडिया' आघाडी आकाराला आल्यानंतर या आघाडीतील पक्ष देशाच्या विविध भागांमध्ये परस्परांच्या विरोधात लढताना दिसताहेत.मात्र, मतभेद असतानाही महाविकास आघाडीतील तिन्ही पक्ष एकत्र लढत आहेत, हे उल्लेखनीय. एका पक्षाने संपूर्ण जागा लढवायच्या ठरवल्या तरीसुद्धा अनेक जागांवर मतभेद असू शकतात. इथे तर चार वर्षांपूर्वीपर्यंत विरोधात असलेले पक्ष एकत्र आले आहेत. त्यामुळे मतभेद स्वाभाविक आहेत.सांगलीच्या जागेवरून दोन्ही बाजूंकडून खूप ताणण्याचा प्रयत्न झाला आणि त्याचा ताण आघाडीवर आल्याचे चित्र निर्माण झाले. परंतु काँग्रेसने नमते घेऊन शिवसेनेला पुढे चाल दिली आणि संघर्ष टाळण्याचा प्रयत्न केला. स्थानिक पातळीवर त्याची किंमत चुकवावी लागणार आहे, याची कल्पना असूनही काँग्रेसने ही तडजोड स्वीकारली.लोकसभा निवडणुकीत शिवसेना २१, काँग्रेस १७ आणि राष्ट्रवादी काँग्रेस (शरदचंद्र पवार) पक्ष १० जागा लढवणार असल्याचे जाहीर करण्यात आले आहे. काँग्रेस आघाडीतला एकमेव राष्ट्रीय पक्ष आहे. अशोक चव्हाणांसह चार-दोन नेते सोडून गेले असले तरी शिवसेना किंवा राष्ट्रवादी काँग्रेससारखी मोठी फूट काँग्रेसमध्ये पडलेली नाही. विधानसभेतील संख्याबळाचा विचार केला तर तिथेही काँग्रेसचे संख्याबळ दोन्ही पक्षांहून अधिक आहे.असे असतानाही जागावाटपात शिवसेनेचे वर्चस्व दिसले. जागावाटपाचा फॉर्म्युला निश्चित होण्याच्या आधीच प्राथमिक चर्चेच्या आधारे शिवसेनेने परस्पर उमेदवार जाहीर करून टाकले, जे काँग्रेससाठी अडचणीचे ठरणार होते. काँग्रेसच्या स्थानिक नेत्यांनी तक्रारीचा सूर लावला; परंतु त्याचा उपयोग झाला नसल्याचे अंतिम जागावाटपानंतर लक्षात येते. मोठ्या पक्षाने जो समजूतदारपणा दाखवायचा असतो तो काँग्रेसने इथे दाखवला.त्याची कारणे देशाच्या राजकारणात शोधावी लागतात. भाजपपासून डावे, तृणमूल काँग्रेसपर्यंत अनेक पक्ष काँग्रेसची कोंडी करण्याचा प्रयत्न करीत आहेत. गांधी कुटुंबीय हे सगळ्यांचे लक्ष्य आहे. अशा स्थितीत काँग्रेसला राष्ट्रीय पातळीवर काही लढाऊ सहकाऱ्यांची आवश्यकता आहे आणि ती गरज उद्धव ठाकरे यांच्या शिवसेनेकडून पूर्ण केली जाऊ शकते.त्याचमुळे शिवसेनेने दादागिरी करूनही काँग्रेसच्या राज्यातील नेत्यांनी ती गुमान सहन केली. काँग्रेसच्या सहनशीलतेचा शिवसेनेने गैरफायदा घेतला, असेही म्हटले जाऊ शकते. ज्या जागांवरून वाद होते, ते मागे टाकून महाविकास आघाडीने पुढे जाण्याचा निर्णय घेतला, एवढाच अर्थ त्यातून निघू शकतो. मात्र, समोर भारतीय जनता पक्ष आणि महायुती असताना त्यांच्याशी लढण्यासाठी पुरेशी मुत्सद्देगिरी आघाडीने दाखवलेली दिसत नाही.एकीकडे महायुतीकडून प्रत्येक जागा जिंकण्यासाठी त्या त्या ठिकाणची परिस्थिती लक्षात घेऊन पक्ष आणि उमेदवार निश्चित करण्यात येत असताना महाविकास आघाडीत मात्र जास्तीत जास्त जागा पदरात पाडून घेण्याची ईर्षा दिसली. वंचित बहुजन आघाडीचे नेते प्रकाश आंबेडकर यांनी आघाडीला अखेरपर्यंत झुलवत ठेवले आणि अखेरच्या क्षणी वेगळी वाट धरली.आंबेडकर यांचा आजवरचा प्रवास पाहता त्याचा अंदाज आघाडीच्या नेत्यांना होता, परंतु अन्य पक्षांना सोबत घेण्यासाठी जी लवचिकता आणि बेरजेचे राजकारण करण्याची आवश्यकता होती, ते इथे दिसत नाही. दिंडोरीसारख्या ठिकाणी डाव्या पक्षांना एखादी जागा सोडणे किंवा राजू शेट्टी यांच्यासारख्या लढाऊ नेत्याला सोबत घेणे यासाठी फारसा उत्साह दाखवला गेला नाही.आंबेडकरी विचारसरणीच्या छोट्या-मोठ्या नेत्यांना सोबत घेण्यासाठीची रणनीतीही दिसली नाही. एकजुटीने लढताना आवश्यक असलेले 'सोशल इंजिनिअरिंग' करण्याची आघाडीला गरज वाटली नाही, ही बाब खटकतेच.

# शिर्डी साई संस्थानच्या वतीने.दि १६ एप्रिल ते १८ एप्रिल याकाळात श्रीरामनवमी उत्सव साजरा होणार

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**शिर्डी । प्रतिनिधी**

श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था (शिर्डी) च्या वतीने सालाबाद प्रमाणे यावर्षी मंगळवार दिनांक १६ एप्रिल ते गुरुवार दिनांक १८ एप्रिल २०२४ याकाळात श्रीरामनवमी उत्सव साजरा करण्यात येणार असून या निमित्ताने विविध धार्मिक व सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले असल्याची माहिती संस्थानचे मुख्य कार्यकारी अधिकारी गोरक्ष गाडीलकर यांनी दिली.

शिर्डी येथे श्रीरामनवमी उत्सवाची सुरुवात १९११ मध्ये श्री साईबाबांचे अनुमतीने करण्यात आली. तेंव्हापासून प्रतीवर्षी मोठ्या उत्साहाने हा उत्सव साजरा केला जातो. यावर्षी उत्सवाच्या प्रथम दिवशी मंगळवार दिनांक १६ एप्रिल रोजी पहाटे ०५.१५ वा. श्रींची काकड आरती, पहाटे ०५.४५ वाजता श्रींच्या फोटोची व पोथीची मिरवणूक, ०६.०० वा. व्दारकामाईत श्री साईसच्चरिताचे अखंड पारायण, ०६.२० वा. श्रींचे मंगलस्नान व दर्शन, सकाळी ०७.०० वा. श्रींची पाद्यपुजा, दुपारी १२.३० वा. श्रींची माध्यान्ह आरती आदि कार्यक्रम होणार आहे. दुपारी ०३.३० ते सायं. ०५.३० वा.निमंत्रीत कलाकारां तर्फे कार्यक्रम होईल तर दुपारी ०४.०० ते सायं. ०६.०० वा. यावेळेत समाधी मंदिराशेजारील स्टेजवर कीर्तन होणार आहे. सायंकाळी ०६.३० वा. श्रींची धुपारती होईल. रात्रौ ०७.३० ते ०९.३० वा. यावेळेत निमंत्रीत कलाकारां तर्फे कार्यक्रम होणार असून रात्री ०९.१५ वा. श्रींच्या पालखीची गावातून मिरवणूक काढण्यात येईल. पालखी मिरवणूक परत आल्यानंतर रात्रौ १०.३० वा. श्रींची शेजारती होईल. यादिवशी अखंड पारायणासाठी व्दारकामाई मंदिर रात्रभर खुले राहणार आहे.

उत्सवाच्या मुख्य दिवशी,बुधवार दिनांक १७ एप्रिल रोजी पहाटे ०५.१५ वा. श्रींची काकड आरती, पहाटे ०५.४५ वा. अखंड पारायणाची समाप्ती होवून श्रींच्या फोटो व पोथीची मिरवणूक होईल. सकाळी ०६.२० वा. श्रींचे मंगलस्नान, दर्शन व कावडी मिरवणूक व सकाळी ०७.०० वा. श्रींची पाद्यपुजा, सकाळी १०.०० ते १२.०० वा. यावेळेत समाधी मंदिराशेजारील स्टेजवर श्रीरामजन्म किर्तन कार्यक्रम, दुपारी १२.३० वा. श्रींची माध्यान्ह आरती होणार आहे. दुपारी ०३.३० ते सायं. ०५.३० वा.निमंत्रीत कलाकारां तर्फे कार्यक्रम होईल, दुपारी ०४.०० वा. निशाणांची मिरवणूक तर सायं. ०५.०० वा. श्रींचे रथाची मिरवणूक होणार आहे. मिरवणूक



परत आल्यानंतर सायं. ०६.३० वा. श्रींची धुपारती होईल. रात्रौ ०७.३० ते १०.०० वा. या वेळेत निमंत्रित कलाकारांचे कार्यक्रम होणार असून रात्रौ १०.०० ते पहाटे ०५.०० वाजेपर्यंत श्रींचे समोर इच्छुक कलाकारांचा हजेरी कार्यक्रम होईल. या दिवशी समाधी मंदिर दर्शनासाठी रात्रभर खुले राहील. त्यामुळे दिनांक १७ एप्रिल रोजीची नित्याची शेजारती व दिनांक १८ एप्रिल रोजीची पहाटेची काकड आरती होणार नाही.

उत्सवाच्या सांगता दिनी गुरुवार, दिनांक १८ एप्रिल रोजी पहाटे ०५.०५ वा. श्रींचे मंगलस्नान व दर्शन, सकाळी ०६.५० वा. श्रींची पाद्यपुजा, सकाळी ०७.०० वा. श्रींचे गुरुस्थान मंदिर येथे रुद्राभिषेक, सकाळी १०.०० ते १२.०० वा. गोपालकाला कीर्तन व दहीहंडीचा कार्यक्रम होणार आहे. दुपारी १२.१० वा. श्रींची माध्यान्ह आरती, दुपारी ०३.३० ते सायं. ०५.३० वा. निमंत्रीत कलाकारांचा कार्यक्रम होईल. सायंकाळी ०६.३० वा. श्रींची धुपारती होईल. रात्रौ ०७.३० ते ०९.३० वा. निमंत्रित कलाकारांचा कार्यक्रम होणार असून रात्रौ ९.१५ वा. श्रींची गुरुवारची पालखी मिरवणूक होईल. रात्रौ १०.०० वा. श्रींची शेजारती होईल.

उत्सवाचे निमित्ताने व्दारकामाई मंदिरात प्रथम दिवशी होणा-या श्रीसाईसच्चरित्राच्या अखंड पारायणामध्ये जे साईभक्त भाग घेवू इच्छीतात अशा साईभक्तांनी आपली नावे मंगळवार दिनांक १५ एप्रिल रोजी दुपारी ०१.०० वा. ते सायंकाळी ०५.२० वा. यावेळेत देणगी काऊंटर नंबर १ येथे नोंदवावीत. त्याच दिवशी सायंकाळी ०५.३० वाजता समाधी मंदिरातील मुख दर्शन स्टेजवर चिठ्ठया काढुन पारायण करणा-यांची नावे निवडण्यात येतील. तसेच उत्सवाच्या मुख्य दिवशी बुधवार दिनांक १७ एप्रिल रोजी रात्रौ १०.०० ते ०५.०० वा. यावेळेत होणा-या कलाकारांच्या हजेरी कार्यक्रमासाठी इच्छुक कलाकारांनी आपली नावे समाधी मंदिराशेजारील अनाऊंसमेंट रुममध्ये आगाऊ नोंदवावीत, असे सांगुन सर्व साईभक्तांनी या उत्सवास उपस्थित राहून उत्सवाची शोभा वाढवावी, असे आवाहन श्री. गाडीलकर यांनी केले आहे.

या वर्षीचा श्री रामनवमी उत्सव यशस्वीरित्या पार पाडण्यासाठी संस्थानचे तदर्थ समितीचे अध्यक्ष तथा प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश सुधाकर यार्लगड्डा, समिती सदस्य तथा जिल्हाधिकारी सिध्दाराम सालीमठ, मुख्य कार्यकारी अधिकारी गोरक्ष गाडीलकर व उप मुख्य कार्यकारी अधिकारी तुकाराम हुलवळे यांच्या मार्गदर्शनाखाली संस्थानचे सर्व प्रशासकीय अधिकारी, संरक्षण अधिकारी, सर्व विभागांचे विभाग प्रमुख व सर्व कर्मचारी प्रयत्नशिल आहे.

## मराठा समाज माझ्याच पाठीशी-सुभाष जावळे

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**परभणी । प्रतिनिधी**

परभणी जिल्ह्यात मराठा समाजाच्या अन्य मागण्या असो की आंदोलन यामध्ये मुख्य चेहरा असतो तो म्हणजे सुभाष दादा जावळे हे यंदाच्या परभणी लोकसभेच्या रिंगणात उतरले आहेत यांनी तब्बल चाळीस वर्षाहून अधिक काळ केवळ मराठा समाजासाठी केलेले कार्य त्यांनी यावेळी सागितले यामध्ये अन्य सामाजिक माग्ण्यासाठी आंदोलन करत आलेलो आहोत या समाजाला न्याय मिळावा यासाठी आजपर्यंत शेकडो वेळा आंदोलने करण्याचे काम आपण केले असून मराठा समाजाच्या विविध मागण्यासाठी करण्यात आलेल्या आंदोलनातून आपणावर शंभर पेक्षा जास्त गुन्हे दाखल झालेले आहेत. त्यासाठी अनेक वेळा तुरुंगवास आपण भोगलेला आहे आणि आता राज्यातील संपूर्ण मराठा समाज आरक्षणासाठी पेटून उठलेला आहे. अशा परिस्थितीत आपण परभणी लोकसभेच्या निवडणुकीत सक्षमपणे उभे असून परभणी जिल्ह्यात सर्वाधिक मतदान हे मराठा समाजाचे आहे आणि गेल्या तीन तपाचे फलित म्हणून संपूर्ण मराठा समाज आपल्याच पाठीशी राहणार असल्याचा विश्वास परभणी लोकसभेचे अपक्ष उमेदवार मराठा आरक्षण समन्वय समितीचे अध्यक्ष सुभाषदादा जावळे यांनी व्यक्त केला,



परभणी लोकसभेचे अपक्ष उमेदवार सुभाषदादा जावळे यांनी आपण गेली अनेक वर्ष सामाजिक कार्य करत असल्यामुळे मराठा समाजाच्या सर्व संघटनांनी मिळून आपणास या लोकसभेमध्ये उभे राहण्याचा आग्रह

केला आणि समाजाने त्यास समर्थन दिले. परभणी जिल्ह्यामध्ये विविध प्रश्न प्रलंबित आहेत, परभणी जिल्ह्याच्या विकासाचा बॅकलॉग भरून काढायचा आहे, राज्यघटनेतील कलम तीनशे (७१) २ ची अंमलबजावणी करून घेण्याचे काम आपल्याला लोकसभेत जाऊन करायचे आहे असे ठणकावून सांगत असतानाच साडेसात लाखाहून अधिक मराठा समाज या मतदारसंघात असून आपण सातत्याने समाजाचे कार्य करत आलेले असल्याने या लोकसभेच्या मतदारसंघातील सर्व समाज आपल्याच पाठीशी रहीलासे सुभाषदादा जावळे यांनी पत्रकार परिषदेत सांगितले.येथील

पत्रकार परिषदेस उमेदवार मराठा समन्वय समितीचे अध्यक्ष सुभाष दादा जावळे, संभाजी सेना प्रदेशाध्यक्ष रामेश्वर काका शिंदे, मराठा सेवा मंडळ प्रदेशाध्यक्ष नितीन देशमुख, संभाजी सेना जिल्हाध्यक्ष विठ्ठल तळेकर,ग्रामीण जिल्हाध्यक्ष सुधाकर सोळंके, संभाजी ब्रिगेड जिल्हाध्यक्ष बालाजी मोहिते, महानगराध्यक्ष गजानन जोगदंड , छावा दल संघटना रामदास अवचार ,मराठा सेवा मंडळ जिल्हाध्यक्ष गोविंद इक्कर, मराठा महासंघाचे बाबासाहेब बचाटे, छावा मराठा संघटना माधवा आवरगंड , शिवमुद्रा संघटना सूर्यकांत मोगल, मराठा परीवार संघटना अमोल अवकाळे क्रांतीसेने संघटनेचे अध्यक्ष रघुनाथ भोसले, पवन कुरील,राजू शिंदे, निलेश भुसारे, स्वप्नील गरुड

## पितृछत्र हरवलेल्या युवतीच्या विवाहासाठी स्वामी आई संस्थेकडून मदतीचा हात

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**मानवत । प्रतिनिधी**

दोन वर्षांपूर्वी पितृछत्र हरवलेले असतांना विवाह ठरलेल्या शहरातील एका गरीब कुटुंबातील युवतीच्या लग्नासाठी येथील स्वामी आई सेवाभावी संस्थेने पुढाकार घेऊन तिच्या मेहंदीचा कार्यक्रम मोठ्या थाटात करून तिला अन्नधान्यापासून सोन्याच्या वस्तू भेट देऊन मदतीचा हात दिला. संस्थेच्या या स्तुत्य व सामाजीक उपक्रमाचे मानवत शहरासह परभणी जिल्हात कौतुक होत आहे .

सविस्तर वृत्त असे की, मानवत शहरा मध्ये राहणारी मोहिनी किरवे ही अतिशय गरीब कुटुंबातील असून तिची आई रोजंदारीने काम करून कसे बसे घर चालवते. तर दोन वर्षांपूर्वी मोहिनीच्या वडिलांची पितृ छत्र छाया हरवली. मोहिनीची आई तीन मुली आणि मुलांना सांभाळत आहे . अशातच मोहिनीचा विवाह योग जुळून आला . सामाजिक दायित्व निभावण्याच्या उद्देशाने मानवत येथील स्वामी आई सेवाभावी संस्थेने पुढाकार घेत शहरातील नगरेश्वर मंदिराच्या सभागृहात मोहिनीचा



लग्नापूर्वीचा मेहंदी कार्यक्रम थाटात घेतला. या कार्यक्रमातच संस्थेतील सर्व महिलांनी चि. सौ.कां. मोहिनीला अन्नधान्यापासून सोन्याच्या वस्तू पर्यंत मदत केली.तिला आहेर , भेटवस्तू , भांडे, अन्नधान्य , आणि पैशाच्या स्वरूपातही लग्नासाठी मदत केली. विवाह सोहळा कार्यक्रम यशस्वीरित्या पार पाडण्यासाठी संस्थेच्या अध्यक्षा सविताताई कत्रुवार, व सिद्धलक्ष्मीताई गुंडाळे यांनी परिश्रम घेतले. या विशेष आणि सामाजीक कार्यामूळे मानवत शहरासह जिल्हात सर्वत्र कौतूक होत आहे.

## राज ठाकरे वाघ माणूस, दिल्लीपुढे झुकणार नाहीत सत्ताधाऱ्यांकडून पिंजऱ्यात अडकवण्याचे प्रयत्न सुरू-वडेट्टीवार

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**मुंबई (वृत्तसंस्था)**

ठाकरे हे वाघ माणूस आहेत. मात्र त्यांना कोल्हा करण्याचा प्रयत्न सत्ताधाऱ्यांकडून होत आहे अशी टीका राज्याचे विरोधी पक्षनेते विजय वडेट्टीवार यांनी केली आहे. तसेच त्यांना पिंजऱ्यात अडकवण्याचे काम सत्ताधाऱ्यांकडून होत आहे अशी शंका वडेट्टीवार यांनी उपस्थित केली आहे.

आज मनसेचा शिवाजी पार्कवर आज मनसेचा गुढीपाडवा मेळावा पार पडणार आहे. गेल्या काही दिवसांपासून मनसे महायुतीमध्ये सामील होणार असल्याच्या चर्चांना वेग आला आहे. मनसे अध्यक्ष राज ठाकरे यांनी दिल्लीत केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांची भेट घेतल्यानंतर तर या चर्चांनी जोर धरला. त्यावर गुढीपाडव्याच्या सभेत मी सर्व काही स्पष्ट करणार असे राज ठाकरे म्हणाले होते. त्यामुळे एकूणच आजच्या सभेकडे सर्वांचे लक्ष लागले आहे. त्यातच आता वडेट्टीवार यांनी देखील यावर प्रतिक्रिया दिली आहे.

वडेट्टीवार यावेळी बोलतांना म्हणाले, ''राज ठाकरे हे वाघ माणूस आहेत. मात्र त्यांना कोल्हा करण्याचा प्रयत्न सत्ताधाऱ्यांकडून होत आहे. राज ठाकरे हे दिल्लीच्या सत्तेपुढे कधीही झुकणार नाही, असे ते वारंवार सांगत होते. मात्र, दिल्लीची वारी त्यांना करावी लागली. यात कुठेतरी त्यांना अडचणीत आणण्याचे, त्यांना पिंजऱ्यात अडकवण्याचे काम सत्ताधाऱ्यांकडून होतंय का, अशी शंका सध्या महाराष्ट्रातील जनतेच्या मनात आहे'', असे वडेट्टीवार यांनी म्हंटले आहे.

वडेट्टीवार यांनी सत्ताधाऱ्यांवर टीका करण्यासह राज ठाकरे झुकणार नाहीत असा ठाम विश्वास व्यक्त केला आहे. ''राज ठाकरे दिल्लीच्या तक्तापुढे झुकणार नाहीत, ही प्रत्येक मराठी माणसाची अपेक्षा आहे. म्हणूनच आज राज ठाकरे जे काही बोलतील ते सत्ताधाऱ्यांच्या विरुद्ध असेल'', असा विश्वासही विजय वडेट्टीवार यांनी व्यक्त केला आहे.

महाराष्ट्राच्या संस्कृतीला काळीमा फासण्याचे काम महाराष्ट्र राज्याचे सांस्कृतिक मंत्री सुधीर मुनगंटीवार यांचे विचार आणि भाषा किती असांस्कृतिक आहे, हे काल महाराष्ट्रातील जनतेने बघितले आहे. काल चंद्रपुर येथे पंतप्रधानांच्या उपस्थितीत पार पडलेल्या प्रचारसभेत महाराष्ट्राच्या संस्कृतीला काळीमा फासण्याचे काम करण्यात आले. अशा विचारांना महाराष्ट्रातील जनता योग्य तो धडा शिकवेल, अशी टीकाही विजय वडट्टीवार यांनी सुधीर मुनगंटीवारांवर केली आहे.तसेच ''अर्धवट माहितीचा आधार घेऊन अशा पद्धतीने किळसवाणे वक्तव्य करणं हे कुठल्याही महाराष्ट्रातील माणसाला न पटणारे आहे. तसेच जनता देखील अशा खालच्या स्तरावरील विचारांना कधीही खपवून घेणार नाही. अशा प्रवृत्तीला आगामी काळात जनता योग्य तो धडा शिकवेल'', असा इशारा वडेट्टीवार यांनी दिला. चंद्रपूरमध्ये झालेल्या सभेत मंत्री सुधीर मुनगंटीवार यांनी काँग्रेसवर खालच्या पातळीवर टीका केली होती. यावरूनच वडेट्टीवार यांनी निशाणा साधला आहे.



## महाविकास आघाडीचे जागा वाटप जाहीर
## ठाकरे गट सर्वाधिक २१ जागा लढवणार; तर काँग्रेसला १७ अन् शरद पवार गटाला १० जागा

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**मुंबई (वृत्तसंस्था)**

महाविकास आघाडीच्या संयुक्त पत्रकार परिषदेत अखेर जागा वाटपाची अधिकृत घोषणा करण्यात आली आहे. या मध्ये उद्धव बाळासाहेब ठाकरे शिवसेना गट २१ लोकसभा मतदार संघात निवडणूक लढवणार आहे. तर काँग्रेस पक्ष १७ लोकसभा मतदार संघात उमेदवार देणार आहे. शरदचंद्र पवार यांचा राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष १० लोकसभा मतदार संघात उमेदवार उभा करणार आहे. अशी घोषणा आज एकत्रितपणे करण्यात आली. सांगली लोकसभा मतदार संघातील वाद आता मिटला असून या ठिकाणी उद्धव बाळासाहेब ठाकरे यांची शिवसेनाच लढणार असल्याचे जाहीर करण्यात आले आहे.

या वेळी उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे प्रमुख उद्धव ठाकरे, शरदचंद्र पवार राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे प्रमुख शरद पवार, काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष नाना पटोले, काँग्रेसचे ज्येष्ठ नेते पृथ्वीराज चव्हाण, शरदचंद्र पवार राष्ट्रवादी काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष जयंत पाटील, बाळासाहेब थोरात तसेच शेतकरी कामगार पक्षाचे जयंत पाटील



यांच्यासह महाविकास आघाडीतील घटक पक्षाचे प्रतिनिधी यावेळी उपस्थित होते.सांगली आणि भिवंडी मतदार संघातील जागा वाटपाचा वाद आता मिटला असल्याचे या वेळी जाहीर करण्यात आले. यातील सांगली लोकसभा मतदार संघ उद्धव ठाकरे यांचा गट लढवणार आहे. तर भिवंडी लोकसभेवर राष्ट्रवादी काँग्रेसच उमेदवार देणार असल्याची घोषणा या वेळी करण्यात आली.

काँग्रेस पक्ष खालील १७ जागा लढणार

नंदूरबार, धुळे, अकोला, अमरावती, नागपूर, भंडारा गोंदिया, गडचिरोली चिमूर, चंद्रपूर, नांदेड, जालना, मुंबई उत्तर मध्य, पुणे, लातूर, सोलापूर, कोल्हापूर, रामटेक, उत्तर मुंबई

शरदचंद्र पवार यांचा राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष १० जागा लढणार

बारामती, शिरूर, सातारा, भिवंडी, दिंडोरी, माढा, रावेर, वर्धा, अहमदनगर दक्षिण, बीड

उद्धव बाळासाहेब ठाकरे यांचा शिवेसना पक्ष २१ जागा लढणार

जळगाव, परभणी, नाशिक, पालघर, कल्याण, ठाणे, रायगड, मावळ, धाराशिव, रत्नागिरी, बुलढाणा, हातकणंगले, संभाजीनगर, शिर्डी, सांगली, हिंगोली, यवतमाळ वाशिम, मुंबई उत्तर पश्चिम, मुंबई दक्षिण मध्य, मुंबई दक्षिण, मुंबई ईशान्य

## 'वर्षा' बंगल्यावर शिंदेंनी घेतली सेना नेत्यांची बैठक
## निवडणूक आयोगाने मुख्यमंत्री कार्यालयाला पाठवली नोटीस

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**मुंबई (वृत्तसंस्था)**

आचारसंहिता लागू असताना देखील मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या शासकीय निवासस्थानी राजकीय बैठका होत असल्याची तक्रार काँग्रेसच्या वतीने निवडणूक आयोगाकडे करण्यात आली होती. त्या तक्रारीवर आता निवडणूक आयोगाने गांभीर्याने घेतले आहे. मुख्य निवडणूक आयुक्तांनी मुख्यमंत्री कार्यालयाच्या सचिवांना यासंदर्भात नोटीस पाठवली असून त्वरीत खुलासा करावा, असे निर्देश दिले. तर उत्तर प्राप्त झाल्यावर त्यानंतर कारवाई केली जाईल, असेही मुख्य निवडणूक आयुक्तांनी सांगितले आहे.मुख्यमंत्री शिंदे यांनी वर्षा बंगल्यावर घेतलेल्या या बैठकीसंदर्भात काँग्रेसचे प्रदेश सरचिटणीस सचिन सावंत यांनी निवडणूक आयोगाकडे तक्रार केली आहे. आचारसंहिता भंग केल्याप्रकरणी कारवाई करण्याची मागणी त्यांनी केली होती. आचारसंहिता लागू होऊन दोन आठवडे उलटले तरी मुख्यमंत्र्यांच्या शासकीय निवासस्थानी राजकीय बैठका होत आहेत. राज्य निवडणूक अधिकारी जागे आहेत का?, असा सवाल त्यांनी केला होता. त्याची दखल आता आयोगाने घेतली आहे.शिवसेनेतील काही विद्यमान खासदारांची तिकीट कापण्यात



आल्याने शिवसेना नेत्यांमध्ये निर्माण झालेली अवस्थता दूर करण्यासाठी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी वर्षा निवासस्थानी दोन दिवसांपूर्वी बैठक घेतली होती. ती बैठक आता वादात सापडली आहे. कारण या बैठकीवरून काँग्रेस नेत्यांनी तक्रार करून आचारसंहितेचा भंग केल्याचे म्हटले आहे.निवडणूक आयोगाच्या आदेशानुसार मुंबईचे जिल्हा निवडणूक अधिकाऱ्यांनी मुख्यमंत्र्यांचे खासगी सचिव, विशेष कार्य अधिकारी यांना नोटिसा पाठवल्या आहेत. कारणे दाखवा नोटिसांना उत्तर देण्यात आल्यानंतर पुढील कारवाई केली जाईल, अशी माहिती राज्याचे मुख्य निवडणूक अधिकारी एस. चोकलिंगम यांनी दिली.

## मत म्हणजे केवळ कागद किंवा बटन नव्हे, मात्र हे समजून घेण्यासाठी

# नागरिकांमधे वैधानिक जागृती करण्यासाठी आवश्यक आहे-डॉ. विजयकुमार कस्तुरे, डव्होकेट, चिखली

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

नांदुरा । ज्ञानेश्वर बुधवत




फुले - आंबेडकर जयंती, २०२४ निमित्ताने नांदुरा, जि. बुलढाणा येथील जयंती उत्सव समितीच्या वतीने आयोजित - डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचा वैचारिक वारसा ही काळाची गरज - या विषयावर दि. ०९ एप्रिल ते १४ एप्रिल, २०२४ रोजी स्थानिक नालंदा नगर येथे व्याख्यानमालेचे आयोजन करण्यात आलेले असून त्याच्या पहिल्या पुष्पात - नागरी जीवनामधे कायद्याचे महत्त्व व परिणाम - या अत्यंत महत्त्वाच्या मुद्द्यावर सविस्तर उकलण करीत असताना महाराष्ट्रातील ज्येष्ठ विधिज्ञ तथा सामाजिक कार्यास्तव अमेरिकन विद्यापीठातर्फे मानद डॉक्टरेट पदवी प्राप्त डॉ. विजयकुमार कस्तुरे, डव्होकेट, चिखली यांनी उपरोक्त विधान केले. तसेच भारतीय संविधानानुसार देशाच्या प्रत्येक नागरिकास देशातील सर्व कायद्यांची माहिती असणे अनिवार्य असून कायद्याची माहिती नसण्याला न्यायालयात क्षमा नाही, तसेच हे लोकांनी, लोकांसाठी, लोकांचे बनविलेले सरकार असल्याने शासन प्रशासनाच्या केंद्र स्थानी लोक म्हणजे या देशाचा प्रत्येक नागरिक असल्याचे सांगून त्यामुळेच दैनंदिन जीवनात आवश्यक ते कायदे जुजुबी स्वरूपात का होईना पण जाणून घेणे कसे गरजेचे आहे हे विषद करून सरकार तथा जन प्रतिनिधींना जनहितार्थ प्रश्न विचारण्याची मानसिकता निर्माण करण्यासाठी मतदानाचा हक्क निरपेक्ष आणि मुक्त पणे विचारपूर्वक बजावला पाहिजे.....

असे परखड विचार व्यक्त केले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक आयुष्मान टी. जी.तायडे यांनी तर समर्थ सूत्र संचालन इंग्रजी विषयाचे ज्येष्ठ मार्गदर्शक आयुष्मान भारत साळवे यांनी केले. याप्रसंगी सोहळ्यातील विशेष अतिथी म्हणून नागसेन बुद्ध विहार संस्था,चिखलीचे सचिव तथा अंतर्राष्ट्रीय समाज भूषण डॉ.डी.व्ही.खरात सर आणि मानवाधिकार ऑथॉरिटीच्या महाराष्ट्राच्या महिला अध्यक्ष तथा अंतर्राष्ट्रीय पर्यावरणच्या पदाधिकारी आयुष्मती शीतल शेगोकार, शेगाव यांचा, त्यांना त्यांच्या सामाजिक योगदानासाठी विविध संस्थांतर्फे पुरस्कृत करण्यात आल्याबद्दल नागरी सत्कार करण्यात आला. तसेच फुले - आंबेडकरी चळवळीतील ज्येष्ठ कवी गायक आयुष्मान नारायणराव डोंगरदिवे यांनी आपल्या सुंदर गीतगायनाद्वारे प्रबोधन केले. आपल्या अध्यक्षीय भाषणातून बौद्ध महासभेचे माजी अध्यक्ष आयुष्मान भीमरावजी तायडे यानीही मोलाचे मार्गदर्शन केले. तर आयुष्मान पी. डी. सरदार यांनी आभार प्रदर्शन केले. कार्यक्रमाला स्थानिक व्यवस्थापन तसेच पोलीस विभागाचे अभिनंदनीय सहकार्य लाभले. शेकडो नागरिकांच्या उपस्थितीमध्ये हा अविस्मरणीय सोहळा संपन्न झाला.

## बीड लोकसभा महायुतीच्या उमेदवार पंकजाताई यांच्या प्रचारार्थ

# पाटोदा येथे शुक्रवारी होणाऱ्या बैठकीस मोठ्या संख्येने उपस्थित रहावे-बांगर

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

पाटोदा । प्रतिनिधी



लोकनेते स्वर्गीय गोपीनाथराव मुंडे यांनी अठरा पगड जातीच्या लोकांचा, शेतकऱ्यांचा आणि सर्वसामान्यांचा विचार करून त्यांच्यासाठी आपले आयुष्य उगळून लावले. त्याच मुंडे साहेबांचा वसा आणि वारसा घेऊन पंकजाताई मुंडे यांनी कार्य केले. महायुतीने अत्यंत विचारपूर्वक पंकजाताई मुंडे यांना बीड लोकसभेची उमेदवारी घोषित केली असल्यामुळे पाटोदा तालुक्यातील आमदार बाळासाहेब आजबे काका यांचे समर्थक पूर्ण ताकदीने पंकजाताई मुंडे यांना विक्रमी मताधिक्याने निवडून आणण्यासाठी रात्रीचा दिवस आणि दिवसाची रात्र करणार असून बीड लोकसभा मतदारसंघाच्या महायुतीच्या उमेदवार पंकजाताई गोपीनाथराव मुंडे यांना पाटोदा तालुक्यातुन संपूर्ण सहकार्य करण्यात येणार आहे या मुळे महायुतीच्या उमेदवार पंकजाताई मुंडे यांना विजयी करण्यासाठी पाटोदा तालुक्यातील महायुतीचे कार्यकर्ते मोठ्या ताकदीने कामाला देखील लागले आहेत. याचं अनुषंगाने बीड लोकसभा महायुतीच्या उमेदवार माननीय पंकजाताई गोपिनाथराव मुंडे यांच्या प्रचारार्थ बीड जिल्ह्याचे पालकमंत्री ना.धनंजय मुंडे, आष्टी/पाटोदा/शिरूर मतदार संघाचे आमदार बाळासाहेब आजबे काका, माजी आमदार भीमराव धोंडे, सहकार महर्षी रामकृष्ण बांगर, राष्ट्रवादी कॉंग्रेस पार्टी अध्यक्ष राजेश्वर चव्हाण, राष्ट्रवादी कॉंग्रेस पार्टी युवक अध्यक्ष बाळासाहेब बांगर यांच्या उपस्थितीत राष्ट्रवादी कॉंग्रेस पार्टी व महायुतीच्या कार्यकर्त्यांची बैठक चाऊस मंगल कार्यालय पाटोदा येथे शुक्रवारी दिनांक १२ एप्रिल रोजी सकाळी ११:०० वाजता आयोजित करण्यात आली आहे या बैठकीस पाटोदा तालुक्यातील महायुतीच्या कार्यकर्त्यांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे असे आवाहन राष्ट्रवादी कॉंग्रेस युवक सोशल मीडिया तालुकाध्यक्ष अक्षय बाळासाहेब बांगर यांनी केले आहे.

# धामणगाव व सांगवी पाटण येथे रमजान ईद उत्साहात साजरा

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

आष्टी । राजू म्हस्के



आष्टी तालुक्यातील धामणगाव व सांगवी पाटण येथे रमजान ईद मोठ्या उत्साहामध्ये साजरी करण्यात आली, महिनाभर निरंकर उपवास धरला जातो, आज कुटुंबामधील सर्व सदस्य नविन कपडे, परिधान करून, गोड जेवण गुलगुले, शिरखुर्मा, घेण्यासाठी घरी बोलवतात, हिंदू मुस्लिम बांधव सर्व सण, यात्रा मिळून मिसळून साजरी करतात व गुण्या गोविंदाने राहतात, यावेळी धामणगाव गटाचे नेते संजय (नाना)गाढवे, मा.पंचायत समिती सदस्य रावसाहेब गाढवे, सरपंच मनोज ( शेठ) गाढवे, मा.सरपंच अमोल (भैय्या) चौधरी, संतोष भणगे सर,किरण नरवडे,दिपक राऊत, रखमाजी महाडिक, सागर राऊत,अंबोरा येथील पोलीस प्रशासन ए.पी आय साळवे साहेब,जगदाळे साहेब, केदार साहेब,पालवे मॅडम,पत्रकार बांधव पत्रकार अंकुश तळेकर,पत्रकार संतोष ससाणे,पत्रकार दादा पवळ, डॉ.अकील सय्यद,शहाबुद्दीन सय्यद, इस्लाम सय्यद,अफसर शेख, सद्दाम शेख, बशीर शेख, इंनुस शेख,साजिद पटेल, आलिम शेख,आमजद बागवान, बादशाह शेख,फारुख शेख, नदीम सय्यद,रफिक पठाण, दादामिया पठाण, बाबर शेख, मुन्ना सय्यद, इस्राईल सय्यद, सिद्धिक सय्यद,राजा पठाण, शाहरुख शेख,फिरोज शेख, अन्सार शेख,व सामाजिक कार्यकर्ते समीर शेख व सर्व समाज बांधव यांनी रमजान ईदच्या शुभेच्छा दिल्या..

# मुद्रित माध्यमातील जाहिराती माध्यम पूर्व प्रमाणिकरण समितीकडून पूर्व-प्रमाणित करण्याचे निवडणूक आयोगाचे निर्देश

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

हिंगोली । सय्यद रहीम रजा

कोणताही राजकीय पक्ष, निवडणूक उमेदवार, इतर कोणतीही संस्था किंवा व्यक्ती यांनी मतदानाच्या एक दिवस आधी आणि मतदानाच्या दिवशी राजकीय जाहिरात राज्य व जिल्हास्तरावरील माध्यम पूर्व प्रमाणिकरण समितीकडून (एमसीएमसी) पूर्ण-प्रमाणित करुन घेणे आवश्यक आहे. पूर्व प्रमाणित केल्याशिवाय कोणतीही जाहिरात मुद्रित माध्यमांमध्ये प्रकाशित करु नये, असे निर्देश भारत निवडणूक आयोगाने दिले आहेत.

राज्यात लोकसभा निवडणूक २०२४ पाच टप्प्यात होणार आहे. पूर्व-प्रमाणित करण्याबाबतचे दिनांक पुढीलप्रमाणे :टप्पा पहिला - १९.४.२०२४, पूर्व-प्रमाणित करण्याचे दिनांक १८.४.२०२४ आणि १९.४.२०२४

टप्पा दुसरा - २६.४.२०२४, पूर्व-प्रमाणित करण्याचे दिनांक २५.४.२०२४ आणि २६.४.२०२४

टप्पा तिसरा - ७.५.२०२४, पूर्व-प्रमाणित करण्याचे दिनांक ६.५.२०२४ आणि ७.५.२०२४

टप्पा चौथा - १३.५.२०२४, पूर्व-प्रमाणित करण्याचे दिनांक १२.५.२०२४ आणि १३.५.२०२४

टप्पा पाचवा - २०.५.२०२४, पूर्व-प्रमाणित करण्याचे दिनांक १९.५.२०२४ आणि २०.५.२०२४

# क्रांतीसुर्य महात्मा ज्योतिबा फुले जयंती उत्साहात साजरी

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

उमरखेड । सय्यद रहीम रजा



महान समाज सुधारक सत्यशोधक समाजाचे संस्थापक क्रांतीज्योती क्रांतीसुर्य राष्ट्रपिता महात्मा ज्योतिबा फुले यांची १९४ वी जयंती निमित्त कोटी कोटी नमन आज दिनांक ११ एप्रिल २०२४ रोजी उमरखेड येथील तहसील कार्यालयात क्रांतीसुर्य महात्मा फुले जयंती उत्साहात साजरी करण्यात आली. निवासी नायब तहसीलदार एम डी नक्कीतवार महात्मा फुले यांच्या प्रतिमेस हार अर्पण करून पुष्प अर्पण करून अभिवादन करण्यात आले. नायब तहसीलदार आर.एम. पंधरे नायब तहसीलदार वैभव पवार अ. का. नागेश एईवाड, अ. का.भागवत पुरवठा निरीक्षक संग्राम गुट्ठे व तहसील कार्यालयातील सर्व अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

# रश्मी बर्वे यांना दिलासा नाहीच,सर्वोच्च न्यायालया नेही फेटाळली याचिका

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

नागपूर (वृत्तसंस्था)

जिल्हा परिषदेच्या माजी अध्यक्ष आणि कॉंग्रेस नेत्या रश्मी बर्वे यांचे जातवैधता प्रमाणपत्र जिल्हा जातप्रमाणपत्र पडताळणी समितीने रद्द ठरविले होते. यामुळे त्यांचा रामटेक लोकसभा निवडणुकीतील अर्ज रद्द करण्यात आला होता. या विरोधात त्यानी न्यायालयात दाद मागितली होती. यावर उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठाने जातवैधता प्रमाणपत्र समितीच्या निर्णयाला स्थगिती दिली होती, मात्र निवडणूक प्रक्रियेत हस्तक्षेप करण्यास नकार दिला. यानंतर बर्वे यांनी सर्वोच्च न्यायालयात दाद मागितली. मात्र सर्वोच्च न्यायालयातून बर्वे यांना दिलासा मिळाला नाही. बुधवारी न्या. भूषण गवई, न्या. संदीप मेहता आणि न्या. सतीशचंद्र शर्मा यांच्या खंडपीठाने बर्वे यांची याचिका फेटाळली.मागील आठवड्यात गुरुवारी उच्च न्यायालयाने रश्मी बर्वे यांना दिलासा देत जातवैधता समितीच्या निर्णयाला अंतरिम स्थगिती दिली होती. मात्र निवडणूक प्रक्रिया सुरू झाली असल्याने त्यात हस्तक्षेप करण्यास न्यायालयाने नकार दिला होता. न्या. अविनाश घरोटे आणि न्या. मुकुलिका जवळकर यांच्या खंडपीठाने हा अंतरिम आदेश दिला होता. न्यायालयाने सर्व प्रतिवादी यांना नोटीस बजावून २४ एप्रिलपर्यंत उत्तर सादर करण्याचे आदेशही दिले आहेत.

## निवडणूक आयोगाच्या मार्गदर्शक सूचनांचा

# अवलंब करुन उमेदवारांकडून छापल्या जाणाऱ्या डमी मतपत्रिका व बॅलेट युनिट तयार करावेत

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

हिंगोली । सय्यद रहीम रजा

जिल्ह्यात १५-हिंगोली लोकसभा मतदार संघाची सार्वत्रिक निवडणूक मतदानाच्या दुसऱ्या टप्प्यात दि. २६ एप्रिल रोजी होणार आहे. त्याअनुषंगाने निवडणूक आयोगाच्या मार्गदर्शक सूचनांचा अवलंब करूनच उमेदवारांकडून छापल्या जाणाऱ्या डमी मतपत्रिका व डमी बॅलेट युनिट तयार करावेत.

निवडणूक आयोगाने दिलेल्या सूचनेनुसार निवडणुकीच्या मतपत्रिकेवर उमेदवाराचे स्वत:चे नाव, चिन्ह ज्या जागी दर्शविले जाईल त्या माहितीच्या आधारे डमी मतपत्रिका छापण्यास हरकत नाही. तथापि, या डमी मतपत्रिकेमध्ये इतर निवडणूक लढविणाऱ्या उमेदवारांची नावे, चिन्हे यांचा समावेश असता कामा नये. या डमी मतपत्रिकेचा आकार व रंग खऱ्या मतपत्रिकेशी मिळता-जुळता असता कामा नये, अशी तरतूद आहे. मतदारांच्या शिक्षणासाठी उमेदवार, राजकीय पक्ष डमी बॅलोट युनिट तयार करु शकतात. ही डमी बॅलेट युनिट लाकूड, प्लॉस्टीक किंवा प्लाय बोर्ड बॉक्सचे असू शकते. सदर बॅलेट युनिटचा आकार अधिकृत बॅलेट युनिटच्या निम्या आकाराचा असावा. सदर डमी बॅलेट युनिट तपकिरी, पिवळा किंवा करड्या रंगाने रंगविलेला असावा.याबाबतचा अधिक तपशील निवडणूक निर्णय अधिकाऱ्यांची हस्तपुस्तिका-२०२३ मधील परिच्छेद १०.१०.१ व १०.११.१ मध्ये दर्शविण्यात आला आहे. त्यामुळे निवडणूक लढविणाऱ्या उमेदवारांनी निवडणूक आयोगाने दिलेल्या निर्देशाप्रमाणेच डमी मतपत्रिका व बॅलेट युनिट तयार करावेत, असे आवाहन जिल्हाधिकारी तथा जिल्हा निवडणूक अधिकारी जितेंद्र पापळकर यांनी केले आहे.

# भाजपला मनसेच्या पाठिंब्यामुळे उत्तर भारतीयांमध्ये असुरक्षिततेची भावना-आंबेडकर

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

अकोला (वृत्तसंस्था)



लोकसभेच्या रिंगणात भाजपने 'सेल्फ' गोल केला. भाजपला मनसेने दिलेल्या पाठिंब्यामुळे उत्तर भारतीयांमध्ये असुरक्षिततेची भावना निर्माण झाली आहे, अशी टीका वंचित बहुजन आघाडीचे राष्ट्रीय अध्यक्ष प्रकाश आंबेडकर यांनी आज येथे केली. सांगलीचे विशाल पाटील वंचितच्या संपर्कात असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

अकोल्यात बुधवारी त्यांनी पत्रकारांशी संवाद साधला. मुंबईसारख्या शहरात मनसे किंवा शिवसेना यांनी अगोदर आंदोलन उभे केले होते. 'लुंगी हटाव, पुंगी बजाव', त्यानंतर उत्तर भारतीयांच्या विरोधातले आंदोलन उभे केले. मनसेने धारावी या ठिकाणी छट पूजेला विरोध केला आणि बिहारमधील लोकांना मारले. मनसेचे प्रमुख राज ठाकरे यांनी भाजप आणि मोदींना पाठिंबा दिल्यामुळे मुंबईत राहणारे बिहार, उत्तर व दक्षिणेतील ज्यांना भाजप जवळची वाटत होती, त्यांना असुरक्षित वाटू लागले आहे, असे प्रकाश आंबेडकर म्हणाले.मुंबईचे उमेदवार आम्ही जाणीवपूर्वक जाहीर केले नाहीत. निवडणूक सुरू झाल्यानंतर मनसेचा पाठिंबा भाजपवाले घेतील आणि ते झाले की, मुंबईमधील पूर्ण गणित बदलते. त्यासाठी आम्ही थांबलो होतो. उद्या संध्याकाळपर्यंत आम्ही मुंबईमधील उमेदवार जाहीर करु, असे त्यांनी सांगितले.

सांगलीमध्ये शिवसेनेचे काहीच नव्हते. शरद पवार आणि उद्धव ठाकरे यांनी मिळून ती जागा घेतली. आज सकाळीच विशाल पाटील यांचे बंधू प्रतीक पाटील यांनी भेट घेतली आणि चर्चाही केली. लवकरच ते निर्णय घेतील, अशी अपेक्षा असल्याचे ड. आंबेडकर यांनी नमूद केले.

हे पत्रक,मालक,मुद्रक, प्रकाशक संपादक ज्ञानेश्वर भाऊसाहेब मुंढे यांनी न्यू गीता प्रिंटिंग प्रेस मिरकाळा ता गेवराई जि बीड ४३११२७ येथे छापून दैनिक लोकनेता कार्यालय हो.नं ५०,मेन रोड मिरकाळा ता गेवराई जि बीड ४३११२७ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले आहे. मो.नं ८४५९९७७९०४

This Newspaper is printed by owner, printer, publisher editor Dyaneshwar Bhausaheb Mundhe at New Geeta Printing Press Mirkala Ta Gevrai District Beed 431127 and published at Dainik Lokneta Office Ho.No. 50, Main Road Mirakala Ta Gevarai District Beed 431127 (Maharashtra) Mo no 84599 77904